# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

---

ग्राहक तक्रार क्र. ५१–२०१०/ दिनांक :

| | |
|---|---|
| श्री. सिदनिंगव्वा गुरुनिंगप्पा पाटील,<br>मु. पो. सोन्याळ, ता. जत, जि. सांगली | अर्जदार |
| **विरूध्द** | |
| १) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,<br>मंडल कार्यालय, विश्रामबाग, सांगली<br>२) कार्यकारी अभियंता<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली<br>३) सहाय्यक अभियंता,<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>उप विभागीय कार्यालय, संख जि. सांगली | विरूध्द पक्षकार |

**कोरम** :– १) श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष,
२) श्री. बी. ए. जाधव, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

## महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग

(ग्राहक तक्रार निवारण मंच)

विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## न्याय निर्णय

श्री. जी. सी. लेले, ग्राहक सदस्य, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. सिदनिंगव्वा गुरुनिंगप्पा पाटील, मु. पो. सोन्याळ, ता. जत, जि. सांगली यांनी गट क्र. ५६ मध्ये ३ एच.पी. वीज कनेक्शन मिळावा म्हणून दि. १४.१२.२००९ रोजी ५० रु. प्रोसेसिंग फी भरुन रितसर अर्ज दाखल केला आहे. वाहिनीचा विस्तार असलेने ग्राहकाने खर्च करावयासंदर्भातील चलन ३० दिवसांचे आंत मिळणे आवश्यक आहे. म्हणजेच दि. १३.१.२०१० पर्यंत चलन मिळणे अपेक्षित होते.

तसे न झाल्याने दि. १६.२.२०१० रोजी सांगली अंतर्गत कक्ष व त्यानंतर २.३.२०१० रोजी सी.जी.आर.एफ. कोल्हापूर यांच्याकडे अ प्रपत्रामध्ये तक्रार दाखल केली. मंचाने सदरची तक्रार दाखल करुन घेवून वि.प.कडून मुद्देनिहाय अभिप्राय मागविला. मुद्देनिहाय अभिप्राय दि. ३१.३.२०१० पर्यंत मिळावा असे कळविले. तथापि वि.प.ने १५.४.२०१० रोजी विलंबाने मुद्देनिहाय अभिप्राय पाठविला. दि. २०.४.२०१० रोजी मंच कार्यालयात सुनावणीची वेळ व तारीख निश्चित केली. सुनावणीच्यावेळी ग्राहकाचे प्रतिनिधी श्री. खापरे व वि.प.चे प्रतिनिधी श्री. कुलकर्णी, कनिष्ठ अभियंता उपस्थित होते. कवठे महांकाळ विभाग अंतर्गत मुद्देनिहाय अभिप्राय येण्यासाठी दिलेल्या मुदतीत अभिप्राय न देणे अथवा सुनावणीच्यावेळीच तसे पत्र देणे या बाबी घडत आहेत, त्या आक्षेपार्ह आहेत हे मुद्दाम नमूद करीत आहे. याची संबंधित विभागातील अधिकाऱ्यांनी योग्य नोंद घेवून वेळेत कागद दाखल करणे याची दक्षता घेणे निकडीचे आहे.

माहे ऑक्टोबर ते नोव्हेंबर या काळात मा. अध्यक्ष व ग्राहक सदस्य यांची पदें रिक्त असल्याने व तक्रार होण्याचे प्रमाण जास्त असल्याने सुनावणी नंतरही निर्णयास विलंब झाला आहे.

अंतर्गत कक्षाचा निर्णय, ग्राहकाची तक्रार, वि.प.चे म्हणणे, सुनावणी दरम्यानची कथने या सगळ्यांचा एकत्रित विचार करुन मंच खालील निष्कर्षाप्रत पोहोचला आहे.

सदर ग्राहकाने दि.१४.१२.२००९ रोजी प्रोसेसिंग फी भरुन रितसर अर्ज केलेला आहे. वाहिनीचा विस्तार असल्याने ३० दिवसांच्या मुदतीत खर्च करावयाचे चलन मिळणे आवश्यक आहे. तसे घडलेले दिसून येत नाही. प्रत्यक्षात दि. २०.२.२०१० रोजी चलन देण्यात आले आहे. याचाच अर्थ १४.१.२०१० ते २०.२.२०१० या ५ आठवड्यांच्या विलंबासाठी विनियमातील तरतुदीनुसार प्रति आठवडा किंवा त्याच्या भागास रु.१००/– भरपाई देणे आवश्यक आहे.

वि.प.ने आपला अभिप्राय दाखल करताना विलंबाने दाखल केल्याचे वर नमूद केले आहे. तथापि मुद्देनिहाय अभिप्राय पत्रातील मजकूर तक्रारीशी सुसंगत नसल्याचे वि.प.च्या प्रतिनिधींना दाखवून दिले. तशी नोंद सदरच्या कागदावर त्यांच्यासमोर केली. लगेचच वि.प.चे प्रतिनिधी श्री. कुलकर्णी यांनी दुसरी माहिती फोनवरुन संपर्क करुन घेवून तसे पत्र मंचास सादर केले. त्यामध्ये चलन दिलेल्या तारखेसह पैंसे भरलेली तारीख व चाचणी अहवाल दिल्याची तारीख नोंदविली आहे. मुद्देनिहाय अभिप्रायाच्या पत्रातील मजकूर हा नोडल ऑफीसरने संबंधित विभागातील संबंधितांना विचारुन कागदपत्रांच्या आधारे मंचाच्या अध्यक्षांना सादर करावयाचा आहे असे कुठलेही कृत्य सांगली सर्कल अंतर्गत विभागातून केले जात नाही तसेच नोडल ऑफीसर म्हणून कार्यकारी अभियंता यांनीही मंचासमोर उपस्थित राहून निवेदन देणे आवश्यक आहे. याही बाबी घडत नाहीत. वरील मुद्देनिहाय अभिप्रायाच्या पत्रात पत्रातील चूक लक्षांत आल्यावर वि.प.चे प्रतिनिधी श्री. कुलकर्णी सदरील माहिती फोनवरुन घेतली व ती मंचासमोर हजर केली ती दुसऱ्या खुलाशा पत्रात नमूद केली आहे. व त्यावेळी दुसरे अभियंता श्री. मैंलापुरे यांचेकडून माहिती घेवून नव्याने पत्र दाखल केले आहे. या सर्व बाबीं गंभीर आहेत याची वि.प.च्या वरिष्ठांनी नोंद घेणे गरजेचे आहे असे मंचाचे स्पष्ट मत आहे.

वर विवेचन केल्याप्रमाणे विलंबाबद्दल ५ आठवड्यांसाठी रु. १००/– याप्रमाणे रु. ५००/– भरपाई वि.प.ने ग्राहकास द्यावी असा मंच आदेश देत आहे.

# आदेश

१)　वर तपशिलात नोंदविल्याप्रमाणे विलंबासाठी भरपाई म्हणून प्रति आठवडा किंवा त्याच्या भागास रु. १००/– या प्रमाणे रु. ५००/– भरपाई वि.प.ने ग्राहकास द्यावी.

२)　वीज जोडणी दिल्यानंतर सदर रकमेचे जास्तीत जास्त दोन बिलींग सायकलमध्ये समायोजन करावे.

३)　खर्चाबाबत आदेश नाही.

४)　सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

५)　या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

दिनांक :　　　　　　　　( जी. सी. लेले )
　　　　　　　　　　　　सदस्य

श्री. बी. जी. पवार, अध्यक्ष　　:

श्री. बी. ए. जाधव, सदस्य सचिव　　: